आठवणींचे उडे पाखरुं

स्फुट लेख संग्रह

डॉ. अशोक सदाशिव नेने

ईशान प्रकाशन नागपूर

जुलै २०२०

आठवणींचे उडे पाखरुं

सूची पत्र

क्रमांक	विषय	पृष्ठ
	प्रस्तावना	०१
१६	आठवणींचे उडे पाखरु	०३
१७	इस दूनिया से दिल न लगे	०६
१८	योग कर्मसु कौशल्यम् ।	०८
१९	बाते कम किजे	१२
२०	आले देवाजीच्या मना	१४
२१	भोवताली दु:ख सारे आपले दु:ख मग बघु	१६
२२	सांस लेना भी सजा लगता है	१९
२३	कोमल वाचा दे रे राम	२१
२४	अतिरेकी पर्यावरणवादी	२३
२५	भीड है कयामत की फिरभी हम अकेले	२६
२६	वाढदिवस की घटदिवस	२८
२७	महाभारतातील गोष्टी- अर्जुन व अश्वथामा	३०
२८	हरवले ते गवसले का? गवसले ते हरवले कां?	३२
२९	रहिये ऐसी जगह चलकर जहाँ कोई न हो	३४
३०	संतांचे लक्षण	३७

प्रस्तावना

“ रिकामे मन म्हणजे सैतानाचे घर “ अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. मनातील विचारांना दिशा दिली नाहीतर ते सैरभैर (सैराट) होते. पूर्वी ग्रामिण स्त्रीया जात्यावर दळण दळताना ओव्या रचत व म्हणत असत आपल्या मनातील विचार व्यक्त करित. आधुनिक कवियत्रींना सुचणार नाही अशा रचना करून गेल्या आहेत. एखादा सोपान आपल्या आईच्या ओव्या पाठ करून लिहून ठेवतो. आचार्य अत्रे सारखा संपादक त्या प्रकाशित करून बहिणबाईला प्रकाशात आणून समस्त मराठी वाचकांचे ऋण फेडतो.

मनाला कंटाळा आला म्हणजे बोअर होणे , अगदी लहान मुले सुध्दा हा शब्द सर्रास वापरतात. एका विक्रीती स्त्रीबरोबर आलेली तीची ५ वर्षाची मुलगी सारखी म्हणत होती ” आई घरी चल मला बोअर झालय” . कुतुहल व निरिक्षणशक्ती नसली म्हणजे असे होते.

मनाची अवस्था सैरभैर होठ नये म्हणून “ दिसामाजी कांहीतरी लिहित जावे “ असे समर्थांनी सांगितले आहे.

पूर्वी मध्यमवर्गीय घरात दैनदिन खर्चाची रोजनिशीत नोंद होत असे. काही काही घरात तर वीस पंचवीस वर्षाच्या रोजनिशी सापडतात. त्या जर नुसत्या चाळल्यातरी मनोरंजक वाटतील. दहा वर्षापूर्वी सोन्याचा भाव काय होता घरात पहिला पंखा टेलिफोन केव्हा आला. परदेश यात्रा केव्हा झाली, स्कुटरचा वाहन परवाना केव्हा मिळाला, अशा असंख्य गोष्टींची नोंद त्यात सापडते.

पेशवेकालीन बखरी शेकडो वर्षपूर्वीचा इतिहास सांगतात. ब्रिटीश गॅझेटीअर मध्ये कोणाता पुल केव्हा बांधला, त्याल किती मजूर लागले , किती खर्च आला ,किती झाडे तोडावी लागली, याची तपशीलवार माहिती आढळते. अशी माहिती आजच्या बांधकाम खात्यातही शोधून सापडणार नाही.

प्रसिध्द उद्योगपती घनश्यामदास बिर्ला यांचा व्यवसाय भारतभर होता. त्यांच्या प्रत्येक कर्मचा-याला सक्त ताकिद होती रोज एक पोस्टकार्ड कलकत्यातील मुख्यालयाला पाठवलेच पाहिजे. अगदी काम

केले नसले तरी कोरे कार्ड पाठवले पाहिजे. आजचे वैद्यकीय प्रतिनिधी (एम आर.) साप्ताहिक अहवाल वरिष्ठांना पाठवतात.

हे सर्व लिहिण्याचे प्रयोजन म्हणजे हा स्फुट लेख संग्रह कां संपादित करावसा वाटला त्याची पार्श्वभुमी वाचकांना कळावी. कांही वाचकांचे त्यामुळे क्षणिक मनोरंजन झाले तरी पुरसे आहे. लोकांच्या प्रतिक्रियांची अपेक्षा नाही. कांहीना मनातील विचार शब्दबध्द करायची इच्छा होईलही

मजरुह सुलतानपुरी या शायराने म्हटले आहे

“ हम अकेले ही चले थे मंझिल-ए –जानिब मगर

लोग आते गये और कारवां बनता गया”

१६-आठवणींचे उडे पाखरुं

'आठवणींचे उडे पाखरु , खेडयामधले घर कौलारु ' हे गदिमांचे प्रसिध्द चित्रपट गीत आहे. कवि शैलेंद्रचे 'याद न आये बीते दिनोंकी , तुम पखेरू होते पिंजरेमे रखता मै ' हे दिल एक मंदिर मधले गाणे आजही प्रसिध्द आहे. आठवणींना सर्व कवि पाखराचीच उपमा देतात. बहिणाबाई म्हणतात ' आता होते भुई वरी गेले आकाशात'

आठवणी एकट्या दुकटया येत नाहीत पक्षांच्या थव्याप्रमाणे येतात. कांही आठवणी मनातल्या जून्या जखमांची खपली काढून मगच जातात. आठवणी व स्मरणशक्ती यांचा परस्पर संबंध जास्त नाही. अप्रिय आठवणी आपण जितक्या विसरू पाहतो तितक्याच खोलवर कोरल्या जातात.

आजची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्याला किती पुस्तकी गोष्टी आठवतात त्याची परीक्षा , भले त्याचे व्यावहारिक ज्ञान शून्य असले तरी चालेल. साक्षात्कार वेळी (इंटरव्ह्यु) उमेदवाराला काय काय आठवत नाही याची जाणिव करून देणे.

कांही बालकांना पूर्वजन्मीच्या घटना आठवतात , आपल्या पूर्वजन्मातील घर माणसे आठवतात.बहुदा अशा व्यक्ती अपघातात मृत पावलेल्या असतात. अशा व्यक्तीचे या जन्मीचेही आयुष्य अल्प असते. पाश्चिमात्य देशात सुध्दा अशी बालके आढळतात.

कोणाची स्मरणशक्ती (मेमेरी) फोटोग्राफिक (चित्रमय) असते. अशी व्यक्ती एखादा चेहरा .कागद किंवा पुस्तक वाचले की आयुष्यभर विसरत नाहीत. कोणाची स्मरणशक्ती ऑडिओग्राफिक (ध्वनीमय) असते एखादा आवाज, गाणे , भाषण ऐकले की तोडपाठ होते. आपल्याला फोन नंबर आठवत नाहीत पण पन्नास साठ वर्षापूर्वीचे ऐकलेले चित्रपटातील गाणे पूर्ण पाठ असते. उदाहरणार्थ 'तुम सिटी बजाना छोड दो. किंवा 'धिरे से आजा रे निंदिया', शोले मधिल गब्बरचे ' कितने आदमी थे?' वगैरे.

वर्गात शिकत असतांना कांही विद्यार्थी डोळ्यांनी शिकतात.शिक्षक फळ्यावार काय लिहितात याकडे त्यांचे सारे लक्ष असते. असे विद्यार्थी पहिल्या १ ते ३ बाकांवर बसतात. कांही विद्यार्थी कानांनी ऐकून शिकतात. असे विद्यार्थी ४ ते ७ बाकांवर बसतात. उरलेले सारे मागच्या बाकांवर बसतात. अगदी चांगला लोकप्रिय शिक्षक असेल तरच ते कान डोळे उघडे ठेवतात.

पुरुषांपेक्षा स्त्रीयांची स्मरणशक्ती अधिकच तीव्र असते. आपल्या घरच्या लग्न मुंजी सारख्या प्रसंगी कोणी व काय काय अहेर केला हे लक्षात ठेवून तशीच परतफेड तीला करता येते. सासरच्या माणसांनी काय काय टोमणे मारले होते ते ती लक्षात ठेवून योग्यप्रसंगी ती सव्याज परत करते. कुत्र्या मांजराप्रमाणे स्त्रीया एकदा पाहिलेला रस्ता विसरत नाहीत. स्वयंपाक घरात कोणती वस्तु कुठे ठेवली आहे किंवा संपली आहे हे तिच्याशिवाय कोणालाच (अगदी सासूला सुध्दा) माहित नसते.

पुरुषांची स्मरणशक्ती ऑफिसपुरती. आपल्या बायकोचा वाढदिवस लक्षात ठेवला म्हणजे पूरे ,(मेहुणीचा वाढदिवस लक्षात असला तरी जाहिर करू नये). काल परवा कोणता शर्ट घातला ते पुरुषाला आठवत नाही. ओफिसला जाते वेळी पत्नीच त्याला आठवण करून देते , अहो पेरुचा पापा घेतलात का ? (थोडक्यात पेन ,रुमाल,चावी,पास व पाकिट – इति हास्य लेखक वि.वा. बुवा) . आपली छत्री आपण कुठे विसरलो ते पुरुषाला आठवत नाही , दोन दिवसात परत करतो म्हणून मिंत्रांनी नेलेली पुस्तके त्याला आठवत नाही. बाजारात जाऊन अगदी तीनच वस्तु आणावयाच्या असतील तरी सुज्ञपत्नी यादी सोपवते.

स्मरणशक्ती शेवटपर्यंत कायम ठेवायची असेल तर उजळणी आवश्यक आहे. पूर्वी गुरुकुलात एकच श्लोक शंभरवेळा घोकून घेत असत. प्रौढकाली गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी त्या वस्तुचा संबध कुढल्यातरी मनोरंजक गोष्टीशी जोडावा . अगदी पाळणा घरापासून हेच तंत्र वापलेले जाते. आधुनिक भाषेत त्याला शब्द-चित्र-ध्वनि संयोग शास्त्र (निमोनिक्स) असे म्हणतात. पानांचा रंग हिरवा , आकाशाचा रंग निळा, पांढरा तो बगळा, काळा तो कावळा असे मुलांना शिकवले जाते.ज्या मध्ये गेयता आहे अशा गोष्टी कायम लक्षात राहतात, जशी लहान मुलांची बडबड गीते.

संस्कृत सारख्या संपन्न भाषेत प्रत्येक शब्दासाठी असंख्य पर्यायी शब्द वापरले जातात , एक या संख्येसाठी सूर्य, दोन साठी नेत्र , हस्त . तीन साठी काल इत्यादि. आधुनिक वनस्पती शास्त्रातील लॅटिन नांवांपेक्षा संस्कृत नांवे आतिशय सोपी व अर्थपूर्ण आहेत , जसे पळस म्हणजे किंशुक – पोपटाच्या चोची सारखे दिसणारे , शतावरी –शतमुली. सातवण -सप्तपर्णी ,निळेचे झाड -निलिनी इत्यादि.

एखादी तारिख, वर्ष लक्षात ठेवण्यासाठी त्यादिवशी घडलेली घटना त्याशी जोडली म्हणजे ती लक्षात रहाते उदाहरणार्थ मुंबईतील बॉम्बस्फोट मालिका= २६ नोव्हेंबर, पहिले चीनी आक्रमण =१९६२, बापुंची पुण्यतिथी =३० ऑगस्ट , विश्व कामगार दिवस =१ मे, इत्यादि.

जाता जाता – शब्द-चित्र-ध्वनि संयोग शास्त्र या विषयावरिल व्याख्यानाच्या शेवटी मी माझे आडनांव व दूरध्वनी क्रमांक कसा लक्षात ठेवावा हे सांगतो-आडनांव- एका जगप्रसिध्द मराठी नटीचे लग्नानंतरचे आडनांव , दूरध्वनी क्रमांक -२ चा ४ वेळा गुणाकार (जूना सहा आकडी क्रमांक,) आता सुरवातीला आणखी २ जोडा म्हणजे आजचा सात आकडी क्रमांक.

१७ - दूनिया से दिल न लगे

शेवटचा मोगल बादशहा 'बहादूर शहा जफर' याचा राजकवी व शेर-ओ-शायरी चा उस्ताद म्हणजे 'इब्राहिम जौक'. त्याच्या एका प्रसिध्द गझलचा एक शेर असा आहे ,

बेहतर तो है इस दूनिया से दिल न लगे ।

पर क्या करे कोई काम बेदिल्लगीसे हुए ॥

ही बेदिल्लगी म्हणजे अलिप्तता , जी आत्मसात करणे भल्याभल्यांना जमत नाही. अल्लड कृष्णाला चोरून लोणी खाणे सोडणे जमले नाही , वर 'मै नाही माखन खायो ' अशी खोटी बतावणी यशोदेकडे करावी लागली (चारा घोटयाळात सजा भोगणारे असेच म्हणतात मैंने चारा नही खाया).

नविन वर्षाच्या सुरवातीला अनेकजण अनेक संकल्प करतात , उद्यापासून दारू सिगरेट गुटका बंद पण हा संकल्प चार दिवसही टिकत नाही कारण गोविंदाग्रजांचे ; एकच प्याला ' हे कालबाह्य झाले आहे,

सुनेच्या संसारात अजिबात लक्ष घालायचे नाही असे ठरविलेली सासू , दुध उतू जाउ लागले की माझ्या मुलाची डेअरी नाही म्हणून सूनेचा उध्दार करते.

परीकथेतील राक्षसाचा प्राण एखाद्या पोपटांत असतो तसा राजकारणी लोकांचा प्राण खुर्चीत असतो. ती गेली की त्यांचा प्राण कासाविस होतो.

वयाची ७५ वर्षे पार केलेल्या , सलग १५ वर्षे सत्तासुख उपभोगून झालेले , राजकारणी लोकसभा , विधानसभा, नाही तर राज्यसभा किमान विधानपरिषदेसाठी वणवण करतांना दिसतात. अगदी

पंतप्रधानपदी राहिलेल्या व्यक्तीसुध्दा राज्यसभेच्या पदासाठी लांगुलचालन करतांना दिसतात. मात्र एखादाच लालबहादूर मंत्रीपदाचा राजिनामा देऊन बसने घरी जातो .

अलिप्तता कमलपुष्पाकडून शिकावी , पाण्यात राहून पाण्याचा स्पर्श नाही. अलिप्ततेची पुढची पायरी म्हणजे स्थितप्रज्ञता ज्याची व्याख्या श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रावरील युध्दप्रसंगी अर्जुनाला सांगितली , 'सुखः दुखेः समेकृत्वा, लाभालाभौ जयाजयौ". अशी वृत्ती अंगिकारणे जमले नाही तरी कवि बा , भ. बोरकर म्हणतात ' नाही पुण्याची मोजणी, नाही पापाची टोचणी, जीणे गंगौदकाचे पाणी" असे जगावे .

१८ - योग: कर्मसु कौशल्यम् ।

माझ्या मातृसंस्थेचे (अल्मामॅटरचे) हे स्मरणवाक्य आहे. कोणतेही आज केलेले काम , हे काल केलेल्या कामापेक्षा अधिक चांगले करणे म्हणजे एक प्रकारचा योग असे बिनोबा भावे यांनी सोप्या शब्दात सांगितले आहे.

आज सहावा जागतिक योग दिवस. योग ह्याचा शब्दश: अर्थ आहे जोडणे (संयोग) . महर्षी पतंजलि ह्यानी हे शास्त्र रचले व विकसित केले. आपले शरिर व मन निरामय ठेवण्याचे हे सोपे शास्त्र. यांत यम, नियम, आसन , प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही आठ अंगे आहेत.

आधुनिक काळात महेश योगी , शिवानंद स्वामी , बी एस अयंगार , परमहंस योगानंद , जनार्दन स्वामी व रामदेव बाबा यांनी योगशास्त्र सर्व जगात लोकप्रिय केले.नरेद्र मोदी यांच्या प्रयत्नाने २१ जून हा दिवस जागतिक योग दिवस म्हणून जगभर पाळला जातो.

प्राचीन भारतीय शिल्पशास्त्रात (विज्ञान व तंत्रज्ञान) दहा उपशास्त्रे सांगितली आहेत. त्यामध्ये संयोगकलेचे किती महत्व आहे हे आपल्या ऋषीमूनींनी कसे सांगितले आहे ते प्रस्तुत लेखात संक्षिप्तपणे देत आहे.

१-कृषीशास्त्र – ह्यामध्ये वृक्षविद्या, पशु विद्या व मनुष्यविद्या यांचा समावेश आहे.

- वृक्षविद्या –दोन झाडांच्या परागांचा संयोग करून बिनबियांची रसाळ फळे देणारे वृक्ष कसे निर्माण करता येतात हे कृषीपाराशर या ग्रंथात आढळते.
- पशु विद्या- घोडा व गाढव यांचे संयोगाने खेचर या उपयुक्त जनावराची निर्मिती झाली व युध्दकामात त्याचा अतिशय उपयोग होतो हे पालकप्प मूनींनी सांगितले आहे.

- मनुष्यविद्या- प्राचीन काली वर्णसंकर (आंतरजातिय विवाह) इतकेच काय सगोत्री विवाह निशिध्द मानला जात असे. यामागचा तर्क असा की संकरसंततीमध्ये गुणांचा गुणाकार होण्याऐवजी दोषांचा गुणाकार होण्याची शक्यता (क्वचित अपवाद वगळता) जास्त असते. आधुनिक काळात हे बंधन कोणी पाळत नाही.

२- जलशास्त्र – यांत जलाग्निवायु संयोग म्हणून एक कला महर्षी भृगु यांनी सांगितली आहे. आजची बाष्प यंत्रे (स्टीमइंजिन) या बाबत ही कला असावी पण यावर अधिक माहिती उपलब्ध नाही कारण मुळ ग्रंथच हिंदुस्तानांत उपलब्ध नाही.

३-खनिशास्त्र (आजचे मायनिंग व मेटलर्जी) – यांत अनेक संयोग कलांचा उल्लेख व सविस्तर वर्णने आहेत.

वनौषधींचा व पारद यांचा संयोग करून सोने चांदी या सारख्या मुल्यवान धातु कशा कराव्या याचे धातुवाद (अॅल्केमी) हे शास्त्र जे आधुनिक शास्त्रज्ञांनी खोटे ठरवले आहे. पण प्राचीन भारतीय रसशास्त्र (रसायन शास्त्र) याचा उगम ह्याच धातुवादातून झाला आहे. धातु व उपधातु निर्मितीची उपकरणे (यंत्रे, मुषा इत्यादि) या संशोधनातून निर्माण झाली.

खनिशास्त्रात धातु संयोग दोन प्रकारचा सांगितला आहे.पहिला प्रकार म्हणजे बलसंकर – दोन धातु अनेकदा ठोकून एकजीव करणे आणि दुसरा प्रकारम्हणे दोन किंवा अनेक धातु वितळवून मिश्र धातु करणे उदाहरणार्थ पितळ , कास्य, पोलाद , पंच किंवा आष्टधातु. ग्रामिण भारतात आदिम जातीचे लोक उच्च प्रतीचे पोलाद निर्मिती साठी काही वनस्पती ,पक्ष्याची पिसे यांचा

उपयोग आजही करतात.

संयोग क्रियेच्या विरुध्द क्रिया म्हणजे पृथ:करण , ही सुध्दा एक आवश्यक कला , घातुशात्रात आहे , यात धातुंच्या खनिजांतून अशुध्द घटक वेगळे केले जातात.

४- रथशास्त्र – बैलगाडीचे लाकडी चाकावर लोखंडी धाव गर करून चढवले जाते हा एक बलसंकराचा प्रयोग.

५-नौका शास्त्र –नावेचे शीड व वारा यांचे सहाय्याने नावेची गती वाढवणे याची 'पटबंधन कला प्रसिध्द आहे. वैदिक वांग्मयात याची उदाहरणे आढळतात.

६- विमान शास्त्रात – एका धतुवर दुस-या धातुचा मुलामा कढवण्याची कला –स्वर्णलेपादि कला संगितली आहे.

७-वास्तुशास्त्र –यांत अनेक संयोग कला आहेत त्या अशा;

- मृत्साधन- मातीत वेगवेगळे पदार्थ (शेवाळ , त्रिफळा याचे पाणी , तागाचे तंतु इत्यादि) मिसळून ती कुंभ कामासाठी (पॉटरी –वीटा ,कौले) उपयुक्त करणे.

- सुधाकर्म – विरलेला चूना , काकवी, वीटकरीचा चूरा किंवा रेतीयांचा संयोग करून भिंतीवर गिलावा (प्लस्टर) करणे.
- रंग कर्म –नैसर्गिक शुध्द व मिश्र रंग बनवणे.
- दारू कर्म – लाकुड काम करतांना दोन तुकडे एकत्र सांधणे

८- प्राकार शास्त्र –यांत शस्त्र विद्या येते. कोळसा , गंधक व काटेसावरीचा कापूस यांचे मिश्रण करून स्फोटके (गन पावडर) कशी बनवावीत याचे वर्णन शुक्रनीतित दिले आहे .

९-नगर रचना शास्त्र व १०-यंत्रशास्त्र यांत संयोग कलांचा उल्लेख आढळत नाही.

कांही द्रव पदार्थ अति संयोगक्षम असतात , उदाहरणार्थ पाणी व साखर , दुध व केशर , तुप व औषधी भस्मे .

१९- बाते कम किजे

आधुनिक भारतीय उर्दु शायर निदा फाजली याच्या गझलेचा हा मतला आहे. सुमारे २५ वर्षांपुर्वी मोबाईलचा भारतांत चंचू प्रवेश झाला. त्यावेळी ३० सेकंड बोललातकी १६ रुपये खर्च येई. एखाद्या दागिन्याप्रमाणे लोक त्याचे प्रदर्शन करित.

लवकरच मध्यम वर्याच्या लोकांचा हातात मोबाईल दिसु लागला पण त्याचा उपयोग 'मी सुखरुप पोहचलो' किंवा 'मला यायला उशीर होईल ' असे कांही मोजके शब्द बोलण्यापूरताच होत असे. आतातर घरोघरी किमान चार फोन असतात. अगदी लहान मुले सुध्दा सर्रास उपयोग करतांना दिसतात.

तीन दशकांपूर्वी संगणकाला तीव्र विराध करणारी पिढीच आता मोबाईलचे गुणगान करतात दिसते. अशा या सर्वव्यापी साधनामुळे आपण किती परावलंबी होत चाललो होत आहोत याचा विचार करणे आवश्यक आहे.

- व्यक्तीव्यक्तीतील प्रत्यक्ष संवाद अतिशय कमी झाला आहे.
- मुले आपल्या आईवडिलांशी बोलण्यापेक्षा परक्या मित्रमैत्रिणींशी तासंतास बोलतात.
- मंगलप्रसंगाची आमंत्रणे सुध्दा मोबाईलने करणे राजमान्य झाले आहे.
- पायी चालण्याची सवय हळुहळु कमी होत चालली आहे कारण अगदी घराजवळच्या वस्तुसुध्दा एका फोन कॉलवर घरी येतात.

- वर्तमानपत्रे , नियतकालिके वाचणे , प्रेक्षागृहात जाऊन नाटके किंवा सिनेमा तेही सहपरिवार पाहणे केव्हांच बंद झाले आहे. कारण टीव्ही व मोबाईल यांनी ती सोय झाली आहे.
- मोबाईल व मोबाईल टॉवर यामुळे चिमण्या कावळे यासारखे पक्षी शहरात शिल्लक राहिले नाहीत.
- अशा ह्या मोबाईलमुळे मानवी मेंदुवर परिणाम दिसु लागले आहेत. स्मरणशक्ती कमी होणे,चिडचिडेपणा वाढणे, निद्रानाश ह्याला काही अंशी मोबाईलच जबाबदार आहे.
- जंक फुडमुळे शरिराचे पोषण होत नाही तसे मोबोईलमुळे ज्ञानात वृध्दी होत नाही तर साबणाच्या फुग्यासारखे हे ज्ञान कांही तासातच विरून जाते.
- सारांश मोबाईलचा उपयोग अगदी आवश्यक कारणांसाठीच केला पाहिजे. बोलता बोलता आपण आपल्या व्यक्तीगत गोष्टी दुस-याजवळ उघड करत तर नाही याचे भान ठेवले पाहिजे . कारण शायर म्हणतो,

बाते कम किजे जहाँनात को छुपाए रखिये
अजनबी शहर है यहां दोस्तोंसे भी बचके रहिये

२० आले देवाजीच्या मना

आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना ।
हरिश्चंद्र ताराराणी , वाही डोंबाघरी पाणी ॥
पांडवांचा सहकारी, राज्यवरोनी केले दुरी।
तुका म्हणे उगी रहावे, जे जे होईल ते ते पहावे॥

१४ जूनला हिंदी चित्रपटसृष्टील एका कलाकाराने वयाच्या केवळ ३४व्या वर्षी गळफास लावून आत्महत्या केली. त्यामागचे कारण अजून उघड झाले नाही. पण या घटनेला जी अमाप प्रसिध्दी मिळाली ती इतर कोणत्याच आत्महत्येला मिळाली नाही.

महाराष्ट्रात दरवर्षी शेकडो कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करतात , परिक्षांचा निकाल लागला की अनेक विद्यार्थी आत्महत्या करतात, प्रेमभंगाची परिणिती बहुदा आत्महत्येत होते. पण शेकडो हजारो कोटींचा अपहार करणारा आत्महत्या करत नाही कारण आपल्या देशातील कायद्यात किती पळवाटा आहेत ते त्याला माहित असते.

निसर्ग कोणत्याही मोठ्या संकटाची पूर्वसूचना देतो , जसे चक्रीवादळ, भुकंप, महापूर, अतिवृष्टी किंवा अवर्षण. कांही पूर्वसूचना माणसांच्या आगोदर पशुपक्षी किंवा किटकांना समजतात.. पक्षी घरटी अति उंचावर बांधतात. भुकंपा अगोदर बीळ करून राहणारे प्राणी बाहेर पडतात. तसे एखाद्याच्या आत्महत्येच्या अगोदर होत नाही. अगदी जिवलग मित्राला सुध्दा या घटनेची पूर्वकल्पना येत नाही.

शत्रुच्याहाती पडून विटंबना होउ नये म्हणून हजारो राजपूत स्त्रीयांनी जोहार पत्करला . गेल्या शतकात पती निधनानंतर हजारो स्त्रीया सती गेल्याची उदाहरणे आहेत.

मुळात मनुष्यप्राणी आत्महत्या कां करतो याची कारणे हे शोधली पाहिजेत.केवळ कमकुवत मनाची व्यक्ती आत्महत्येला लवकर प्रवृत्त होते तर कांहीना प्रवृत्त केले जाते असे म्हटले जाते पण अतिकठोर व्यक्तीसुध्दा आत्महत्या करतात . कायद्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे गुन्हा आहे. संजीवन समाधी किंवा स्वेच्छामरण ही एक प्रकारची आत्महत्याच आहे.

कोणत्यातरी घटनेमुळे आत्महत्येचा विचारांची बीजे मेंदुत रुजु लागतात. त्याचे कांही दृष्य शाररिक परिणाम दिसू लागतात. जसे भुक तहान हरपणे. डोळे निर्विकार होणे ,कानावर पडलेले शब्द मेंदुपर्यंत न पोहचणे इत्यादि. कांहीच्या बाबतीत आत्महत्येचे विचार आले की कृतीत काही तासातच उतरतात. तर काहींना अंमलात आणण्यास कांही महिन्यांचा अवधी लागतो. अशा व्यक्तीचे मन परिवर्तन योग्य मानसिक उपचारांनी करता येते व ते करणे आवश्यक आहे.

हिंदु धर्मात आत्महत्या हे अक्षम्य पाप आहे असे सांगितले आहे. आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या आत्म्याला मुक्ती मिळत नाही. गृहस्थी व्यक्तींनी आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या प्रेताला खांदा देऊ नये किंवा अंत्यविधीत भाग घेऊ नये पुराणात लिहिले आहे.

आम्ही असू लाडके या मराठी चित्रपटात एक प्रार्थना आहे. " जीवनाला अर्थ लाभो हीच अमुची प्रार्थना" एकदा का याचे मर्म समजले की हे मानवी जीवन किती अमुल्य आहे , सुंदर आहे याची जाणिव होते आणि मग आत्महत्येचे विचार आपोआप पळून जातात.

२१-भोवताली दु:ख सारे आपले दु:ख मग बघु

इलाही जामदार (रायगड) यांचा हा एक शेर आहे. फार थोड्या लोकांना त्याचा मतितार्थ लक्षात येतो. समर्थ रामदाससुध्दा हेच सांगतात ' जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तुच शोधून पाहे.' पण बहुतेक लोक आपलेच दु:ख कुरुवाळतांना दिसतात. कोणी आपल्याला पदोन्नती मिळाली नाही , कोणी आपल्या नव-याने हौस मौज पुरवली नाही अशा गोष्टीबद्दल कुरकूरतांना दिसतात. मनाप्रमाणे जगावयाचे किती किती छान बेत होते असे म्हणून खंत करतात. पण 'सुख पाहता जवाएवढे. दु:ख पर्वता एवठे' असे संतच सांगून गेले आहेत.

एकदा एक स्त्री आपल्या मृत मुलाचे शरिर घेऊन गौतम बुध्दांकडे गेली व आपल्या एकुलत्या एक मुलाला जीवंत करा म्हणून विनवू लागली. त्यावर बुध्दाने तीला सांगितले की ज्या गावांत कोणी मरण पावला नाही अशा गावातून फक्त पणतीभर तेल आण मी तुझा मुलगा लगेच जीवंत करतो. ती स्त्री दहा गांवात फिरली पण कुठल्याच गांवात तीला तेल मिळाले नाही व आपली चूक तीला लक्षात आली.

अरविंद गोखले यांची 'सुखकर्ती' म्हणून एक कथा प्रसिध्द आहे. थोडक्यातती कथा अशी आहे.

घरांत नातवाच्या लग्नाचा मांडव घातला आहे. ऐन वेळी आजोबांची प्रकृती विघडते. मुलगा सून लग्न पुढे ढकलावे या विचारात असतात. पण आजी मात्र निक्षून सांगते लग्न ठरल्याप्रमाणेच होऊ द्या. लग्नकार्य पुर्ण होई पर्यंत माडीवरील आमच्या खोलीकडे फिरकायचे सुध्दा नाही. लग्न पार पडते , जेव्हा सर्वजण आशिर्वादासाठी वर जातात , तेव्हा आजी दार उघडते आणि सांगते की काल रात्रीच आजोबा वारले. नातु गदगद होऊन म्हणतो आताच आम्ही आरती केली पण खरी सुखकर्ती तून आहेस.

फार वर्षांपूर्वी कथासागर म्हणून एक दूरदर्शन मालिका येत असे त्यातील 'बैल के दो सींग ' ही कथा कायम लक्षात राहिली आहे.

मनिंदर व सुखविंदर हे लष्करातील दोन जिवलग मित्र. सुखविंदरला एक आठवड्याची सुटटी मिळाली. मनिंदरने त्याला बजावले की माझे गांव वाटेवरच आहे , येतांना माझ्या घरी जा. तुझा खुप चांगला पाहुणचार होईल , गेल्यागेल्या माझे वृध्द वडिल तुझ्यासाठी आले घातलेला चहा आणतिल व जेवल्याशिवाय निघू देणार नाहीत. माझी पत्नी तुला आग्रहाने आलु पराठे खाउ घालेल. मुले मात्र काय मिठाई आणली ते शोधतील.

त्याप्रमाणे सुखविंदर मनिंदरच्या घरी गेला . घरी निरव शांतता होती , मनिंदरचे वडिल अडखळत चहाचा कप घेऊन आले. बरेच वेळ झाला तरी ते कांहीच बोलत नाही म्हणून निघतांना सुखविंदर म्हणाला भाभी दिसत नाही तेव्हा भाभी बाहेर आली , चेह-यावरचा दुपटटा बाजूला केला आणि भाभीचे पांढरे कपाळ पाहून त्याला घक्काच बसला. वडिल म्हणतात कालच तार आली की तुमचा मुलगा शत्रूशी लढतांना शहिद झाला , उद्या पार्थिव शरिर ते सोपतील. मनिंदरने तु येणार आहेस हे कळवले होते

ही बातमी मला अगोदरच का सांगितली नाही असे सुखविंदर विचारतो तेव्हा मनिंदरचे वडिल म्हणाले ' बेटा ही पृथ्वी एका बैलाने दोन शिंगांवर तोलून धरली आहे. फार भार झालातर तो एका शिगावरून दुस-या शिंगावर ते ओझे सरकवतो पण जमीनीवर पडून देत नाही. आपल्या घरी जाऊन तु आनंदात परत निघाला आहेस तेव्हा तुला दु:ख देण्याची इच्छा नव्हती.

२६ जून २०२०

२२-सांस लेना भी सजा लगता है

शिर्षक वाचून वायु प्रदुषणावरचा हा एखादा लेख असावा असा समज होण्याची शक्यता आहे. पण पुढची ओळ जी विचार करायला लावते ,ती अशी आहे;

सरे बाजार मे यारों की तलाश, जो गुजरता है खफा लगता है

आयुष्याचे ७५ वसंत पाहून झालेल्या एखद्या जेष्ठ नागरिकाचे हे विचार असावेत. व.पु. काळेंनी म्हटले आहे या लोकांना तुमचा पैसा नको , सन्मान नको , हवी असते थोडीशी आपुलकी (कंसर्न).

माझे एक जेष्ठ सहकारी कामानिमित्त लंडनला गेले होते. सकाळी प्रभात फेरी करतांना त्यांना बाकावर बसलेले वृध्द दांपत्य दिसले. जवळ जाऊन संवाद सुरु केला. त्यांच्या व्यवसायाची , मुला नातवंडाची चवकशी केली, त्यांना योगाची माहिती देऊन निघतांना , त्या दांपत्याने थांबवले व दहा पौंडाची नोट दिली आणि म्हणले नाही म्हणू नका , गेले कित्येक दिवसात आमच्याशी बोलणारा आम्हाला भेटला नाही, पैशाची ददात नाही. मुले मुली यांना आमच्याकरता भेटायला बोलायला वेळ नाही. दरवर्षी वाढदिवसाला आठवणीने पुष्प गुच्छ व केक पाठवतात.

भारतीय लोक पाश्च्यात्याचे लगेच अनुकरण करतात. वडिलांच्या पश्चात संपती बरोबर वृध्द आईची ही वाटणी होते . आईला दुस-या भावाकडे केंव्हा पाठवायचे याची नोंद कॅलेंडरवर असते. बागवान चित्रपटात, नटसम्राट नाटकात हे वास्तव दाखवले आहे.

तरुण श्रावण कुमार आपल्या वृध्द आई वडलांना दोन कावडीत वसवून त्यांना तीर्थयात्रा घडवत असतांना त्याच्या मनांत विचार आले ' किती दिवस मी हे ओझे वाहायचे व केंव्हा मी गृहस्थाश्रम

सुरू करणार". त्याच्या अंध मातापित्याला आपल्या मुलाचे हे विचार समजले . ते म्हणाले बाळा इतकी दिवस तु आमचे सेवा केलीस आता फक्त एकच काम कर येथून जवळच्या दुस-या गांवात एक धर्मशाळा आहे तेथे तु आम्हाला सोड व पहाटे तु आपल्या वाटेने निघून जा.

त्याप्रमाणे श्रावणाने त्यांना सोडले. पहाटेला श्रावणाला अति पश्च:ताप झाला , त्याने आईवडलांची क्षमा मागितली तेंव्हा त्याचे वडिल म्हणाले बाळा हा तुझा दोष नाही, दोष होता त्या जागेचा, म्हणजे हस्तिनापूरचा (आजची दिल्ली) जेथे तुझ्या मनात असे विचार आले. आजच्या श्रवण कुमारांना परिस्थिती व भौतिक मोह अगतिक करतात असे आपल्या मनाचे समाधान आई वडिल करतात.

आजचे कांही सुज्ञ जेष्ठ, काळाची पावले ओळखून समाजकार्याला वाहून घेतात, अपूर्ण राहिलेला छंद जोपासतात , संघाच्या प्रात:शाखेत जातात. पण ज्यांना हे काहीच जमत नाही ते "घाईत होते ते गेले पुढे मी मात्र थांबून पाहतो मागे किती जण राहिले " या उक्तीप्रमाणे वर्तमानपत्रातील निधनवार्ता वाचून ' *माझे किती क्षण राहिले* ' *याचे चिंतन करतात.*

२३- कोमल वाचा दे रे राम

समर्थ रामदास यांनी १२ वर्षे आपल्या आराध्य देवाची रामाची साधना केली , शरिर बलदंड केले. गावोगावी मारुती व रामाची मंदिरे बांधावी व त्यानिमित्याने परकिय शत्रुविरुध्द जनमानस निर्माण करावा या साठी पदयात्रेला निघण्यापूर्वी नाशिकच्या काळाराम मंदिरात बसून रामाकडे याचना केली व आशिर्वाद मागितले, ती ही कोमलाष्टके. आपली वाचा कोमल व निर्मल असेल तरच लोक आपले म्हणणे ऐकतील याची त्यांना खात्री होती.

शब्द हे एक शत्र आहे ते जपून वापरले पाहिजे . अनेक वर्तमान पत्रांचे शिर्षकच असते " शब्द नव्हे शस्त्र" पण मुळात बरीचशी वर्तमान पत्रे राजकीय पक्षांनी विकत घेतली असतात . पाळीव कुत्र्याप्रमाणे कोणावर केव्हा भुंकायचे व केंव्हा शेपुट घालायची हे त्यांना पूर्णपणे माहित असते. कोणाची खाजगी कुलंगडी चव्हाट्यावर आणून एखाद्याची राजकीय कारकीर्द कशी संपवायची , सामान्य नेत्याला संभाव्य मुख्यमंत्री , प्रधानमंत्री म्हणून कायम प्रकाश झोतात कसे ठेवायचे हे तंत्र जमले की वर्तमानपत्र यशस्वी ठरते.

राजकारणात वाचा कोमल असून चालत नाही . जो वक्ता कोणताही पूरावा नसतांना वैयक्तीक पातळीवर जाऊन गलिच्छ प्रचार करातो तो पक्षाचा अधिकृत प्रवक्ता बनतो . हाताशी एखादे लंगोटी पत्र हाती असेल तर आधीच मर्कट त्यात मद्य प्याला अशी अवस्था होते. अस्खलित खोटे बोलणे , वारंवार ते खोटे बोलणे हे एक तंत्र आहे (जे गोबेल्स तंत्र म्हणून ओळखले जाते). संसदेत किंवा विधानसभेत कितीही खोटे बोलले तरी ना खटला भरतो न शिक्षा होते , जास्तीत जास्त ते शब्द कामकाजातून काढून टाकले जातात. सरकारी कार्यालयात कोणी मद्यपान करून आल्यास त्याच्यावर कारवाई होते पण संसदेत दारू पिऊन कोणी झोपला तरी कारवाई होत नाही.

संसारी स्त्रीयांना कोमल वाचा ठेवून चालत नाही . वारंवार सुट्या करणा-या मोलकरिणीला , दुधात भेसळ करणा-या दुधवाल्या भैयाला , वजनात दांडी मारणा-या भाजीवाल्याला चारचौघात मोठ्याने दम द्यावा लागतो. अभ्यासात टंगळमंगळ करणा-या मुलांवर ही ओरडावे लागते. वेळप्रसंगी अति धुम्रपान करणा-या नव-याला त्याच्या आईवडलांसमोर खडसावे लागते.

वाचा कोमल असली तरी स्पष्ट असावी गुळमिळीत नसावी , निर्भिड असावी म्हणजे लोक योग्य तो मान ठेवतात. खोटे बोलू नये पण हिताचे असेल तर खरे बोलण्याचे टाळावे म्हणजे म्हणजे खोटे बोलण्याचा आरोप होत नाही. महाभारतात सत्यवचनी युधिष्टिराला युध्दप्रसंगी " नरो वा कुंजरावो " असे अर्धसत्य बोलावे लागले. लोणी चोरून मी खाल्ले नाही असे कृष्णाला सुध्दा म्हणावे लागले.

वाचा म्हणजे वाणी . ती उच्चारण्यासाठी टाळु , दात,जीभ व ओठ यांचा समंन्वय घडवून आणावा लागतो. सासू व माय या नात्यामधिल फरक बहिणाबाई सुंदर रितीने सांगते. सासू म्हाणतांना दोन ओठ दूर जातात पण माय म्हणतांना जवळ येतात. आधुनिक स्वरशास्त्राच्या अभ्यासकांना इतक्या सोप्या शब्दात हे सांगता येणार नाही .

२४- अतिरेकी पर्यावरणवादी

सध्या पर्यावरण हा शब्द फार बोकाळला आहे. शहरा-शहरात पर्यावरणवादी शिबिरे घेतात, पुस्तके लिहितात, काही दूरदर्शनवर मुलाखती सुध्दा देतात.

मी अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना पाणी पुरवठा व मलनि:सारण असे दोन जोड-विषय असत. पुढे पर्यावरण अभियांत्रिकी असे त्याचे नामकरण झाले . आणि साधे वरण , फोडणीचे वरण यांत पर्यावरण शब्दाची भर पडली . आपल्या ऋषी मुनींचा पर्यावरण प्रदुषणाची पूर्ण कल्पना होती . वेद , उपनिषद ब्राम्हण ग्रंथ, अरण्यके यात पर्यावरण संतुलनावर शेकडो संदंर्भ आहे .

चाणाक्याच्या अर्थशास्त्रात प्रदुषण करण्यावर काय दंड करावे हे सुध्दा सांगितले आहे. तैतिरिय ब्राम्हणांत सर्व प्रथम पंचमहाभुतांची कल्पना मांडली आहे . या घटकांचे संतुलन म्हणजे पर्यावरण संतुलन. आधुनिक शास्त्रज्ञांना आता आता समजलेले विषय , जसे वायु , ध्वनी , भूमी , अंतरिक्ष प्रदुषण याचा सखोल विचार भारतीय ऋषीनी हजारो वर्षांपूर्वी केला होता. पण कुठल्याही पाठ्य पुस्तकात याचा समावेश नाही.

शिळ्या भातात काजु बेदाणे केशर घालून रावण भात कसा बनवावा हे आजकाल पाककला वर्गात शिकवले जाते. तसाच प्रकार हे अतिरेकी पर्यावरणवादी करतांना दिसतात. त्यांनी सुचवलेल्या कल्पना वाचून ऐकून हसावे की त्यांची कीव करावी असा प्रष्ण पडतो . या कल्पना अशा,

- **हापूस आंबे खाउ नका** – त्यामुळे पेट्या बनवण्यासाठी जंगलतोड होते , पण बांबु , गवत, पाने असेही पर्याय शोधा असे कोणी म्हणत नाही.

- **प्रेतावर दाहसंस्कार करू नका** -प्रेत जमिनीत पूरावे, त्यामुळे जंगलतोड कमी होईल – शेणाच्या गोव-या वापरून कमी खर्चात दाहसंस्कार संस्कार करता येतो , तेही मान्य नसेल तर देहदान किंवा नेत्रदान व अवयव दान करा असे सांगावे.
- **अंघोळ कमीत कमी पाणी वापरून करा** (८ लिटर पाण्यात) त्यामुळे पाण्याची बचत होते- अंघोळीचे पाणी झाडांना द्या – शहरांत आसपास झाडेच नसतील तर काय करावे ते सांगावे .टबात अंघोळ करून ते पाणी कुंड्यातील महागड्या झाडांना द्यावे काय ? व काही झाडांना सकाळ संध्याकाळ पाणी लागते म्हणून दोनदा अंघोळ करावी का?
- **चुलीची राख वापरून भांडी घासावी** – म्हणजे डिश वॉशिग पावडर स्क्रबर वापरू नये – ज्या सोसायटीत फ्लट मध्ये चुल पेटवणे नियमविरुध्द आहे तेथे काय करावे ? की स्मशानातील राख वापरावी म्हणजे अनायसे स्मशान वैराग्यही येईल.
- **अंघोळ करतांना साबण वापरू नका – उटणे वापरावे** – त्याने शरिराचा दुर्गंध कमी होईल याची खात्री नाही , जंतुनाशक साबण वापरणे आवश्यक आहे . कोरोना कालात असा विचार करणे म्हणजे मुर्खपणा आहे.

या तथाकथित पर्यावरणवादी लोकांना अजुन न सुचलेल्या गोष्टी अशा ;

- **केसांसाठी कोणतेही तेल वापरु नका** – त्यामुळे तेल निर्मितीसाठी लागणा-या उर्जेची व पैशाची बचत होईल.
- **दाढी करू नका** – त्यामुळे दाढीसाठी लागणा-या पाणी , साबण व ब्लेड या वस्तु टाळता येतील, वेळेची बचत होईल .
- **कातडी पादत्राणे वापरू नका** -त्यामुळे पशुहत्या टळेल ,रबर व प्लस्टिकची पादत्राणे वापरु नये – त्यांच्या निर्मितीमुळे प्रदुषण वाढते . लाकडी खडावा वापरा ,(त्यामुळे ब्रम्हचर्य पालनही होते, असा शास्त्रीय आधार आहे.)

- **दांत स्वच्छ करण्यासाठी टुथपेस्ट व प्लस्टिकचा ब्रश वापरू नका** . कडुनिंब व बाभुळ यांच्या काड्या वापरा व पाण्याची बचत करा, इत्यादि इत्यादि

पर्यावरणवादी मंडळीनी, लोकाना रस्त्यावर कचरा टाकू नये , रस्त्यात थुंकु नये , लघवी करून नये , पाळीव कुत्रे रस्त्यात घाण करणार नाहीत याची खबरदारी कशी घ्यावी इत्यादि गोष्टी सौजन्यने पण आग्रहपूर्वक सांगावे. पायी चालण्याचे महत्व सांगावे.पथदिवे दिवसभर चालु असतात, त्याचा निषेध विद्युत मंडळाकडे करावा, ई बीलचा आग्रह धरावा व ई पेमेंट कसे करावे याचे लोकांना शिक्षण द्यावे अशा अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत.

सर्वात महत्वाचे- आपल्या विक्षिप्त वागणुकीचे समर्थन करू नये , अन्यथा पेनी वाईज , पौंड फुलिश अशी गत होईल .

तळटीप – या लेखाचा उत्तरार्ध एक विनोदी लेख म्हणून समजावा. म्हणजे कोणाच्या भावना दुखावणार नाहीत,

२५- भीड है कयामत की फिरभी हम अकेले

मेला ह्या ६० वर्षपूर्वीच्या चित्रपटातील हे गीत आज खुप समयोचित वाटते. माणुस एकटाच जन्माला येतो व जग सोडतां नाही तो एकटाच असतो मग ही एकटेपणाची खंत कशाला?

पूर्वी साधु सन्यासी एकांतवासासाठी हिमालयात जात व तप साधना करित. बौधभिक्षु पाषाणात कोरलेल्या गुहेत वास्तव्य करित. समर्थ रामदास सुध्दा सज्जानगडावर एकांतवासी जात.

आजकाल कांही लोक विपश्यना शिबिरात जातात , १५ ते ३० दिवस संपूर्ण मौन पाळतात. सुर्य प्रकाश असेल तेव्हाच दैनंदिन व्यवहार , भोजन वाचन जपजाप करायचा व सुर्यास्तानंतर निद्रेशिवाय कोणताच व्यवहार नाही असे नियम पाळतात.

पूर्वी कारगृह म्हणजे सक्तीचा एकांतवास . कांही राजकारणी दोन दिवस कारगृहात राहून स्वतंत्र सैनिक म्हणून मिरवतात, मिळतील ते सर्व लाभ घेतात. कांही देशभक्त कैदी तेलघाणी चालवूनसुध्दा कारागृहाच्या भिंतीवर अजरामर काव्यरचना लिहून पाठ करतात , देशासाठी चिंतन करतात. कांही भाग्यवंत कैदी कारागृहात सुध्दा पंचतारांकित सोई उपभोगतात.त्याही कमी वाटल्यातर उपवासाचे नाटक करतात.

आजकालची कारागुहे म्हणजे मनोरंजनगगृहे , तेथे टीव्ही , रेडियो , वर्तमानपत्रे असतातच पण अधिका-याना चिरिमिरी तर सिगरेट , गुटका अगदी विलायती मद्याच्या बाटल्या सुध्दा मिळतात. अशा परिस्थितीत त्या बिचा-या कैद्यांना एकांत कसा मिळणार व मनात पश्चतापाची भावना कधी येणार?

वृध्दत्व आले की न मागता , नकोसा वाटणारा एकांतवास सक्तीने मिळतो. अशा व्यक्तींना स्वतंत्र खोली असते, सहा आठ आसनी डायनिंग टेबल असले तरी जेवणाचे ताट सुध्दा खोलीतच येते. त्याच्या एकांतवासाचा भंग घडू नये म्हणून मुले सूना नातवंडे जवळ फिरकत नाहीत. कांहीकडे मोबाइल असतो पण समवयस्क व्यकींना बोललेले ऐकू येत नाही. धरच्यांशी संवादच नसल्यामुळे वाद निर्माण होण्याचा प्रश्ण निर्माण होत नाही. आपोआप निवांतवास मिळतो.

अशावेळी काय करावे याचे उत्तर कबिराने दिले आहे.



जो सुख पाऊ नाम भजन ने। वो सुख नाही अमिरी मे ॥
कहत कबिरा सूनो भाई साधो । साहिब मिले सबूरी मे ॥
मन लागो यार फकिरी मे॥

२६-वाढदिवस की घटदिवस

वाददिवस म्हणजे वयात एक वर्षाची वाढ. खरे पाहिले तर बालकाच्या मेंदुची आठव्या वर्षापर्यंत पूर्ण होते. शाररिक वाढ (उंची) वयाच्या पंचविशीपर्यंत पूर्ण होते. वयाच्या चाळीशीनंतर दृष्टी अधु होउ लागते, केस गळु लागतात . पुरुषांना टक्कल पडते. काहींना चाळीशी लागते. पन्नाशीत दांत हलणे सुरू झालेले असते. साठीत काहींना कानांनी कमी येणे सुरु होते , सत्तरीत चालताना काठी लागते. ही सर्व वस्तुस्थिती असली तरी माणसे चाळीशीनंतर सुध्दा वाढदिवस साजरा करणे सोडत नाही. कोणतेही विशेष कर्तुत्व न दाखवलेली व्यक्ती आपली साठी ,७५ वी व सहस्त्रचंद्र दिवस एखाद्या समारंभासारखा, केसाला कलप लावून, साजरा करतात.

वाढदिवस म्हटला म्हणजे बाजारातून केक आणणे , त्यावर लावलेल्या मेणबत्या पेटवणे . सर्वांच्या साक्षीने फुंकर मारून विझवणे ,इतरांनी ठरविक हॅपी बर्थडे टु म्हणत टाळ्या वाजवणे हे सर्व आलेच. एरवी पेटलेला दिवा वा-याने जरी विझला तरी अशुभ मानणारे या दिवशी फुंकर मारून विझवणे शुभ मानले जातात.

राजकिय नेत्याचा वाढदिवस म्हणजे एक महोत्सव असतो , वर्मानपत्रात चार पानी पुरवणी छापली जाते. सकाळ पासून संध्याकाळपर्यंत कार्यकर्त्यांसाठी सहस्त्रभोजनाचा कार्यक्रम होतो. काही नेत्यांची धान्यतुला होते, रात्री खास लोकांची पार्टी होते. मनोरंजनासाठी खास डांस पार्टी बोलावली जाते. असा हा नेता किती लोकप्रिय आहे ह्याची कल्पना दुस-या दिवशी कचरा पेटीत किती हार व पुष्पगुच्छ दिसतात, विदेशी दारूच्या किती रिकाम्या वाटल्या दिसतात, त्यावरून येते.

कांही नेत्यांची जयंती दरवर्षी साजरी होते. चौकातले विद्रुप झालेले पुतळे त्यानिमित्ताने स्वच्छ केले जातात. त्यांना हार घातले जातत. नागपुरसारख्या शहरात याच कामासाठी राष्ट्र पित्यापासून नगरसेवकांचे पुतळे उभारलेले असतात.

बहुतेक लोक "वृध्दत्वी निज शैशवास जपणे " या उक्ती प्रमाणे नातवंडात रमतात. फळांनी बहरलेले झाड वाकते पण कांहींचा ताठरपणा वयानूसार वाढतच जातो ,घरातले सर्व व्यवहार मला विचारूनच झाले पाहिते असा त्यांचा आग्रह असतो. अशांसाठी समर्थ रामदास रामाला साकडे घालतात " कोमल वाचा दे रे राम " . हिंदी भाषेत वृध्द व्यकीसाठी बुढा व बुजुर्ग असे शब्द सर्रास वापरले जातात . पण प्रत्येक वृध्द (बुढा) अनुभवाने शाहणा (बुजुर्ग) असतोच असे नाही.

काही कवींनी वृध्दपणाचे वास्तव या शब्दात सांगितले की " जो जाके वापस नही आती ऐसी जवानी देखी और जो आके वापस नही जाता ऐसा बुढापा देखा."

पण मिर्झा गालिबने आपले वेतन दरमहा ठरविक दिवशी मिळाले म्हणून काव्यमय अर्ज लिहिला. शेवटी बादशहाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा ज्या दोन ओळीत शुभेच्छा दिल्या त्या अजरामर झाल्या आहेत."तुम जीओ हजारो साल और हर साल के दिन हो पचास हजार"

२७- महाभारतातील गोष्टी – कालच्या आणि आजच्या

अर्जुन व अश्वथामा

अश्वथामाच्या आईचे नांव कृपी जी आचार्य कृपाचार्य यांची बहिण . तीने शंकराची घोर तपस्या केली व शंकराचे वरदान म्हणून अश्वथाम्याच्या कपाळावर एक दिव्य रत्न होते. त्याला चिरजीवीत्वाचे वरदान होते .तो जेव्हा जन्मला तेव्हा तो घोड्यासारखा खिंकाळला म्हणून त्याचे नांव ठेवले गेले अश्वथामा (अश्व मुखातून प्रकट झालेली दिव्यवाणी).

पितामह भीष्म यांनी शंभर कौरव व पाच पांडव राजपुत्रांच्या घनुर्वेद व इतर विद्या यांच्या शिक्षणासाठी आचार्य द्रोण यांची नियुक्ती केली. द्रोणाचार्य यांचा पुत्र अश्वथामा यालाही इतर १०५ राजकुमारांबरोबर शिक्षण देण्यास अनुमती दिली . शिक्षण देत असतांना द्रोणाचार्य परिक्षा घेत असत. झाडावर मातीचा पोपट ठेवून बाणाने त्या पोपटाच्या डोळ्याचा वेध घेण्यास सागितले . अर्जूना व्यतिरिक्त कोणाला ही ते जमले नाही शेवटी अर्जुनाला विचारले तुला काय दिसते आहे , तेव्हा अर्जुन म्हणाला गुरुवर्य मला फक्त पोपटाचा डोळाच तेवढा दिसतो आहे. अर्जुन परिक्षेत यशस्वी झाला . अर्जुनाची गुणवत्ता ओळखून फक्त त्यालाच कांही दिव्य अस्त्रे शिकवली.त्याला ब्रम्हास्त्र कसे सोडायचे व परत आपल्या ताब्यात घ्यायचे हे शिककले . त्याचवेळी अश्वथामा चोरून ऐकत होता. त्याला ब्रम्हास्त्र कसे सोडावे हेच ऐकु आले पण ते अस्त्र परत कसे घ्यायचे हे समजले नाही. त्याचा काय अनर्थ झाला ते महाभारताच्या वाचकांना माहित असेलच.

राजशिक्षक असूनही द्रोणाचार्य दरिद्री अवस्थेत राहिले. इतर राजपुत्र भरपूर गोदुग्ध पिऊन येतात हे अश्वथाम्याला कळले तेव्हा त्याने ही आईजवळ दुधाचा हट्ट धरला , घरच्या परिस्थितीत ते शक्य नसल्याने त्याची आई पाण्यात भिक्षेत मिळालेले तांदुळाचे पीठ मिसळून देत असे.

आजचा द्रोणाचार्य विद्यार्थ्यासाठी कोचिंग वर्ग चालवतो व दर दिवशी एकावेळी ५० ते ६० विद्यार्थ्यांना तीन तीन बॅचेस मध्ये शिकवतो.प्रती विध्यार्थी २५ते २६ हजार अशी माफक गुरुदक्षिणा घेतो. याशिवाय क्रश कोर्स मध्ये संभाव्य प्रश्नही सांगतो.

आजचा अश्वथामा शिकवणी वर्ग लावल्या लावल्या मोटर सायकल व मोबाईल मागतो. एक तासाच्या वर्गासाठी तीन तास वेळ घालवतो. परिक्षेत कांही विद्यार्थी नक्कल करतात , परिक्षकाचा खिसा गरम करून उत्तिर्णही होतात. कर्तुत्व नसल्याने वशीला लावून नोकरीही मिळवतात. वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठी वरिष्ठाच्या घरची कामे करतात.त्यामुळे अशांची बदली १५ -२० वर्षेसुध्दा होत नाही.

द्रोणाचार्यांनी फक्त अर्जुनाकडेच गुरुदक्षिणा मागितली , ती म्हणजे ज्या द्रुपद राजाने माझा अपमान केला त्याला माझ्या समोर बंदी करून आण. द्रोणाचार्यांनी बंदीवान द्रुपदाला क्षमा करून सोडून दिले पण आजचे आचार्य काय काय गुरुदक्षिणा घेतात त्याची कल्पना न केलेली बरी . असे आचार्य व विद्यार्थी एकत्र सिगारेट ओढतांना व गुटका खाताना दिसतात. काही निर्ढावलेले आचार्य खाजगीत सांगतात " कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है"

तु तर म्हणालास मी
पोपटाला पाढे शिकवले आहेत

मी म्हणालो मी पाढे शिकवले
पण हे कुठे म्हणालो की तो शिकला आहे.

२८ - हरवले ते गवसले का? गवसले ते हरवले कां?

पूर्वा कल्याण रागावर आधारित, कवि पी सावळारामांचे , लताने गायलेले हे गीत संध्याकाळच्या कातरवेळी अंतर्मुख करून सोडते.

आपले काय हरवले व आपल्याला काय गवसले त्याचा हिशेब हा आपापला करायचा . कोणाचे बालपण वडलांच्या अकाली मृत्युने हरवते. कोणाचे तारुण्य कुटुंबाचा भार उचलण्यात नाहीतर दुर्धर आजारात किंवा अपघातात हरवून जाते , म्हातारपणात हरवण्यासारखे काहीच शिल्लक नसते.

ईश्वर प्रत्येक माणसाला तीन संधी देतो असे ऐकिवात आहे. कुठला रस्ता सांग खरा वळणावरचा की सरळ बरा असा त्याला अनेकदा प्रश्न पडतो. जो योग्य रस्ता निवडतो तो जीवनात यशस्वी होतो. इच्छा नसून केवळ वडलाच्या आग्रहामुळे कुणी आभियांत्रिकी महाविद्यालयात जातो. चार वर्षांचा अभ्यासक्रम सहा सात वर्षात कसाबसा पूर्ण करतो . पुढे काही करायची जिद्द हरवून बसलेला असतो. मोठ्यांच्या धाकामुळे मोकळे हसण्याचे काही विसरलेले असतात.

लग्नानंतर सासरी गेलेल्या मुली अकाली प्रौढ होतात , ज्यांचे मन मेंदीच्या पानावर झुलत असते. नाईलाजाने नोकरी करणा-या विवाहित स्त्रीया आपले मातृत्व हरवलेल्या असतात. भरतकाम, विणकामाचे सुंदर नमुने पेटीत बंद करून ठेवलेले असतात. बहिणाबाईने सांगितलेले सत्य "आधि हाताला चटके मग मिळे भाकर" हे तीने ऐकलेले असते पण हे चटके तीने एकटीनेच कां सोसायचे असा प्रश्ण तीला पडतो.

हरवण्याबरोबर कांहीना गवसले सुध्दा असते. कोणाला निरपेक्ष माया करणारे , स्वत: अर्धपोटी राहून मुलाचे शिक्षण पूर्ण करणारे आई वडिल मिळाले असतात , कोणाला मनाजोगता, हसतमुख जीवन साथी मिळाला असतो , कोणाची मुले घराण्याचे नाव उज्वल करतात. कोणाला अडिअडचणीच्या वेळी धावून येणारे, भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे म्हणणारे मित्र मिळतात. ठेविले अनंते तैसेची रहावे , चित्ती असु द्यावे

समाधान अशी वृत्ती असली काय हरवले किंवा गवसले हे बघायची आठवणसुध्दा येत नाही.

एक शायर म्हणतो “ जो नही मिला उसे भुल जा , जो मिला उसे याद रख. “

२९ - रहिये ऐसी जगह चलकर जहाँ कोई न हो

जन्म -२७डिसेंबर १७९७ – मृत्यु १५ फेब्रुवरी १८६९

गालिब म्हणजे असदुल्लाह खान , त्याचे आजोबा समरकंद येथून तुर्की सैन्याबरोबर हिंदुस्तानात आले व आग्रा तेथे स्थाईक झाले वडलांच्या निधनानंर काही दिवस काकासोबत राहिला . लहानपणीच त्याचे लग्न झाले व घरजावई म्हणून सास-याकडे दिल्लीला राहू लागला . लहानपणापासून फरसी व उर्दु भाषेवर प्रभुत्व मिळवले वयाच्या अकराव्या वर्षीच फारसी मध्ये कविता करू लागला . त्याचे सुरवातीचे टोपण नांव होते असद पण नंतर गालिब हे टोपणनांव वापरून उर्दु काव्यरचना केली. दिल्ली दरबारच्या शायरांनी आग्राहून आलेल्या या शायराला दरबारात प्रवेश करु दिला नाही पण आपल्या प्रतिभेमुळे तो बादशहा जफरला प्रिय झाला.

रेडीयो वर सुरय्याने गायलेली *"रहिये अब ऐसी जगह चलकर जहाँ कोई न हो "* ही गालिबची गझल कानी पडली आणि विचार चक्रे सुरू झाली.

खरेतर मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. एकांत हा त्याला कारावासापेक्षा कठिण भासतो. मग मिर्ज़ा ग़ालिब सारख्या कवीला अशा पंक्ती का सुचाव्या याचे आश्चर्य वाटते. हे समजण्यासाठी त्या काळची राजकिय परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल .

इंग्रजांनी सर्व सत्ता आपल्या ताब्यात घेतली , कटपुतळी बादशहाला कैद करून ब्रम्हदेशात कैदेत टाकले, त्याच्या दोन्ही पुत्राची हत्या केली , शेकडो स्वातंत्य सैनिकांना मेहरोलीच्या जंगलातील झाडांवर लटकवून फाशी दिली.

गालिबला सात मुले झाली पण ती अल्पायुषी ठरली . न कधी त्याने नमाज पढला ना कधी मशिदीत गेला. त्याची बिबी उमराव बेगम त्याला वारंवार मशिदीत जाण्याचा आग्रह करीत असे त्यावर गालिबचे एकच उत्तर मी आतां कोणत्या तोंडाने दूआ मागू व ती कोणासाठी ? गालिब चे सर्व आप्त मित्र पैगंबरवासी झाले . त्यांच्या प्रेतांना खांदा देणारा गलिब मात्र ऐशी वर्षे जीवंत राहिला. मरणानंतर ही त्याच्या शायरी मुळे तो जीवंत राहिला आहे . गालिब म्हणजे श्रेष्ठ. त्याने लिहून ठेवले आहे की " *है दूनियामे सुखनवर (शायर) बहोत अच्छे ,कहते है की गालिब का है अंदाज-ए-बयां और.*"

जून्या दिल्लीतील बल्ली-मारान या ठीकाणी असलेल्या गालिबच्या राहत्या घराचे गालिब संगहालय करण्यात आले आहे. भारत सरकारने त्याच्या नावाने एक डाक तिकिटही काढले आहे.



त्याचे शेकडो शेर हिंदुस्तान वपाकिस्तानच्या लोकांना तोंडपाठ आहेत व ते व्यवहारात वापरले जातात. उदाहरणार्थ;

हम भी जानते है जन्नत की हकीकत लेकिन ।

दिल के बहलाने को गालिब ये खयाल अच्छा है. ॥
हजोरो ख्वाइशे ऐसी की हर ख्वाईश पे दम निकले ।
बहोत निकले मेरे अरमान, फिर भी कमा निकले॥
मोहोब्बत मे नही है फर्क जीने और मरने का ।
उसी को देख कर जीते जीस काफिर पे दिल निकले॥
हमे मालुम है के तगाफुल (वंचित) न करोगे लेकीन ।
खाक हो जायेंगे तुम को खबर होने तक ॥
दिल ही तो है न संगकिश्त , कोई हमे सताए क्यु।
रोयेंगे हम हजार बार कोई हमे मनाए क्यु ॥
मुश्किले मुझपर पडी इतनी के आसां हो गयी ॥
दर्द हो दिल मे तो दवा कीजे ।
दिल ही जब दर्द हो तो क्या कीजे ॥
मौत का एक दिन मुय्यन (निश्चित) है।
नींद क्यु रात भर नही आती. ॥
बसके दुशवार है हर काम का आसां होना. ।
आदमी को भी मुयस्सर नही इंसा होना. ॥

असा हा महान भारतीय शायर १५ फेब्रुवरी १८६९ रोजी मरण पावला. पण स्वत:च्या कर्तुत्वाची गालिबला एवढी खात्री की ' हुई मुद्दत के मर गया गालिब ,मगर बहुत याद आता है. " असे जीवंतपणीच लिहून गेला.

३०-संतांचे लक्षण

एका संत चरित्रात ख-या संताचे लक्षण सागितले आहे "संतत्व नाही कवित्वात, संतत्व नाही मठात, संतत्व नाही विद्वतेत, तेथे स्वानुभव पाहिजे." ही ओळ चांगल्या शिक्षकाला तंतोतंत लागु पडते. हे समजणे सर्व शिक्षकांना आवश्यक आहे.

- **संतत्व नाही कवित्वात**- कांही शिक्षक उत्तम वक्ते असतात. मुळ विषय सोडून तासंतास ते बोलू शकतात. त्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेतले तर सहज लक्षात येते की शिक्षक पाठ्याक्रमातील विषयाबद्दल कांहीच बोलले नाही.
- **संतत्व नाही विद्वतेत** – कांही शिक्षक उच्चशिक्षा विभुषित असातात. त्यांच्या नांवापुढे किमान तीन डिग्र्या असतात. कांही परदेशात शिक्षण घेतलेल असतात.पण त्यांची सारी विद्वत्ता स्वत:पुरतीच असते. कठिण विषय अधिक कठिण करून सांगतात. सुपर फास्ट एक्स्प्रेस सारखी त्याच्या भाषणाची गाडी सुटते , एखाद्या विद्यार्थ्याने हिंमत करून प्रश्न विचारलाच तर त्याची उलट तपासणी घेऊन इतर मुलांसमोर त्याला खजिल करतात , मग इतर कोणी प्रश्न विचारण्याचे धाडस करत नाही.असा शिक्षक उत्कृष्ठ शिक्षक म्हणून पदकही पटकावतो,
- **संतत्व नाही मठांत** – काही नामवंत संस्थेतून (आय आय टी , जे एन यु) पदवी घेतलेले असतात. इतर शिक्षकांना ते तुच्छ समजतात. त्यांचे ब्रीद वाक्यच असते की "शिक्षकाचे काम शिकवायचे नसून, विद्यार्थ्यांना स्वयंशिक्षण कसे घ्यावे याचे मार्गदर्शन करणे हे आहे" ते नवनविन प्रयोग करतात . एखाद्या विषयाचे १५ उपविषय विद्यार्थ्यांना देऊन वर्गासमोर त्यांनाच भाषण द्यायला लावतात. मुलांनीच मुलांना शंका विचाराव्या अशी त्यांची शिकवायची पध्दत असते. हली सर्व पदवीउत्तर शिक्षणक्रमात हेच चालु आहे .
- **तेथे स्वानुभव पाहिजे** -ज्या शिक्षकाला त्याच्या विषयाचा स्वानुभव किंवा पुर्वानुभव असेल तोच खरा शिक्षक. मातीत हात न घातलेला शिक्षक फारतर व्हीडिओ दाखवेल , पण रोपांची लागवण कशी करावी हे सांगु शकणार नाही. चांगला शिक्षक शिकवलेला विषय सर्वांना समजला आहे की नाही याची काळजी घेतो. अ वर्गात(तुकडीत) सर्व हुशार मुले असतात , त्यांना कोणताही शिक्षक चालतो पण ड वर्गासाठी हाडाचा शिक्षकच लागतो. वेळप्रसंगी विशेष वर्ग घेणारा लागतो.

नागपूरचे एक शिक्षणमहर्षी (पदवी परिक्षेत नापास) पण दहा शिक्षणसंस्थांच चालक (मालक) , दरवर्षी नविन लागलेल्या शिक्षकांसमोर ठराविक (लिहून आणलेले) भाषण देत. "शिकवणे हे तुमचे ध्येय (मिशन) असले पाहिजे त्याला व्यवसाय (प्रोफेशन) समजु नका. "

एखादा विष्णुगुप्त सारखा शिक्षक नंदाची मगधेतील सत्ता उपटून टाकून चंद्रगुप्ताला त्याच्या सिंहासनावर बसवू शकतो,

आपल्या देशात शिक्षकाला प्रतिष्ठा नसेल पण परदेशात त्याचा मान ठेवला जातो. विमानतळावर एखादा शिक्षक उभा असेल तर त्याला सर्वात प्रथम बोर्डिंग पास मिळतो. विमानातून उतरल्यावर टॅक्सी हवी आहे का याची चवकशी केली जाते.

गुरुची महती काय असते हे कबिराने सांगितले आहे , तो म्हणतो " गुरु गोविंद दोनो खडे किसके लागु पाय, गुरू बलिहारी जिसने गोविंद दिखाय"

अजूनही तीस वर्षांपूर्वी शिकलेले सेवानिवृत्त चीफ इंजिनिअर ,सेक्रेटरी, कॉलेजचे प्रिंसिपॉल भर रस्यात वाकून नमस्कार करतात, सोबत बायको मुले असतील तर अभिमानाने सांगतात "हे माझे सर" अन मग " याच साठी केला अट्टाहास , शेवटचा दिस गोड जावा " हे तुकारामाचे वचन आठवते

लेखक परिचय

प्राध्यापक अशोक सदाशिव नेने

- बी.ई. नागपूर, एम.ई, पीएच. डी. रुडकी विश्वविद्यालय.
- अध्यापन (३० वर्ष) विश्वेश्वरय्या राष्ट्रिय अभियांत्रिकी संस्थान, नागपूर.
- १५० पेक्षा अधिक शासकिय व अशासकिय प्रकल्पांचे मृदा अभियांत्रिकी सल्लागार.
- विद्यार्थींसाठी स्वयंशिक्षण योग्य ६ संगणकिय सॉफ्टवेअर चा विकास
- प्राचीन भारतीय शिल्पशास्त्र विषयावर ४ मुद्रीत तथा १५ ई बुक प्रसिध्द. त्यालील एक पुस्तकाचा पॅरिस येथिल कालमंजुषा मध्ये समावेश .
- ५० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाधित..
- शोधकार्य मार्गदर्शन- ३ विद्यार्थी पीएच. डी. आणि २ विद्यार्थी एम.ई, उपाधी प्राप्त.
- एक आंतरराष्ट्रीय परिषद समितीचे ४ वर्ष आमंत्रित सदस्य .
- २ आंतरराष्ट्रीय व १० राष्ट्रीय संमेलनामध्ये आमंत्रित वक्ता.